**कै.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ श्रद्धांजली म्हणून विखे पाटील शालेय ग्रंथालय योजना सुरू करण्यात येत आहे.**

तुमचं जीवन जसा आशिर्वाद समाजाला
सोडुन गेलात तुमच्या आठवणींचा खजिना आम्हाला
तुम्हावर प्रेम शब्दापलीकडले
आणि स्मरतो आम्ही अगणीत तुम्हाला

१९५0 साली महाराष्ट्रात झालेल्या साखर सहकार चळवळीचे जनक डॉ. विठ्ठलराव विखे पाटिल यांच्या स्मरणार्थ डॉ. विखे पाटिल फाऊंडेशनची स्थापणा करण्यात आली. त्यांच्यातील नेतृत्व गुण , मुल्ल्ये आणि दुरदृष्टीने ग्राम मुक्तीच्या प्रक्रियेला आरंभ प्राप्त करून दिला, जो आजही कार्यरत आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार निर्मितीच्या संधी यांमुळे महाराष्ट्राच्या विकासात अमुलाग्र बदल आणले. हेच उल्लेखणीय कार्य पुढे डॉ. बाळासाहेब विखे पाटिल यांनी चालु ठेवले. ज्यांनी गोर गरीब समाजाच्या उत्थानाला
प्राधान्य दिले आणि समाजसेवेसाठी आपले जीवन खर्च केले. वडिलांनी आरंभलेल्या प्रयत्नांना बाळासाहेबांनी यशस्वीपणे आपल्या खाद्यांवर पेलले, पुढेही चालु ठेवले आणि त्यांना एक तार्किक परिसमाप्ती दिली. त्यांनी शैक्षणिक सुविधा पुरविण्यात, आरोग्य सुविधा आणि वित्त क्षेत्रात महत्त्वपुर्ण भुमिका बजावली. शेतकी उद्योगातील सुधारणा, जलसंवर्धन आणि शेती या क्षेत्रांमधे उल्लेखणीय सहभाग नोंदवला. शेतकरी समजासाठी केलेल्या या विलक्षण कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. २०१0 साली त्यांना भारत सरकारचा नागरी पुरस्कार, ‘पद्मभुषण’ बहाल करण्यात आला
त्यांच्या निधनाने प्रवरा सेंटर ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अॅड डेवलपमेंट, विखे पाटिल मेमोरिअल स्कुल, पुणे—नाशिक—लोहगाव व लिटल फ्लावर स्कुल, लोणी येथील असंख्य कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्या मधे शोककळा पसरली. त्यांच्या दुरदृष्टीला पुढे नेत डॉ. अशोक विखे पाटिल यांनी ग्रामिण आरोग्य व शिक्षण क्षेत्रात प्रगती करण्यास व सुधार आणण्यासाठी अनेक प्रकल्प यशस्वीपणे रूजवून पुर्तीस नेले. त्यांच्या गतीशील नेतृत्वाखाली अनेक आरोग्य व शैक्षकणिक सुरवातींना प्रारंभ मिळाला जो आज अहमदनगर व पुणे जिल्ह्यात

भव्य सिध्दी म्हणुन उभ्या राहतात. पुणे आणि अहमदनगर मध्ये पारंपारिक पणे कार्यरत असलेल्या इतर शैक्षणिक संस्थांना आव्हान देत बाल केंद्रित पध्दतीच्या उत्क्रांतीला महत्त्व देण्यासाठी या आरोग्य व शैक्षणिक संस्था अथकपणे कार्यरत आहेत.

आपल्या वडिलांची सुजीवण गाथा साजरी करण्यासाठी आणि त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणाला आदरांजली वाहण्यासाठी, ३0 डिसेंबर २0१७ रोजी २00 ग्रामिण शाळांच्या ग्रंथालयांस पुस्तकांची अपुर्व देणगी देण्याचे काम डॉ. अशोक विखे पाटिल यांनी हाती घेतले आहे.

अनेक शाळांमधे वाचन सामग्रीच्या गैरउपलब्धतेमुळे **उद्भविणाऱ्या** दयणीय परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी हा प्रकल्प हाती घेतला आहे.

डॉ. विखे पाटिल फाऊंडेशन महाराष्ट्रातील जिल्ह्या जिल्ह्यातून ग्रामिण शाळांचे विहीत स्वरूपातील अर्ज स्वीकारीत आहे. हे अर्ज पत्रकारनगर, सेनापती बापट रोड, पुणे कार्यालयात येत्या नववर्षात उपलब्ध करण्यात येतील.

सदर योजनेचा तपशील शाळेच्या संकेत स्थळावर **online http://www.drvpf.org** ऊपलब्ध आहे.

सदर योजनेत पात्र होण्यासाठी संकेत स्थळावर दिलेले निकष पुर्ण करणे आवश्यक आहे.